दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २४७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.७ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# २४ तासात हल्ले थांबले नाहीत तर आमचाही संयम सुटेल : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**गेल्या काही दिवसांपासून मी पाहातोय सीमावाद उफाळून आला आहे आणि याला वेगळं वळण देण्याचं काम केलं जात आहे. सीमावादावर आता भूमिका घेण्याची वेळ आली आहे आणि स्थिती गंभीर झाली आहे. येत्या २४ तासांत हल्ले थांबले नाहीत तर आमचाही संयम सुटेल, असा रोखठोक इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला आहे. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.**



महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद आता दिवसेंदिवस चिघळत असल्याचं दिसून येत आहे. बेळगाव-हिरेबागवाडी येथील टोल नाक्यावर महाराष्ट्र पासिंगच्या ट्रकवर कन्नड रक्षण वेदिका संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून दगडफेक करण्यात आली. तसंच महाराष्ट्राविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. याच घटनेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

बेळगावात आज जे घडलं ते निषेधार्ह आहे. सीमाभागात काही घडतं तेव्हा कटाक्षानं सीमाभागातील काही घटक माझ्याशी संपर्क साधतात. माझ्याकडे जी माहिती आहे ती अतिशय चिंताजनक आहे. मराठी भाषकांवर दहशतीचं वातावरण आहे, कार्यालयासमोर त्यांचे पोलीस, महाराष्ट्रातून येणाऱ्या प्रत्येक वाहनाची चौकशी केली जात आहे.

निवेदन देण्यासही मज्जाव केला जातोय. आज महाराष्ट्रातील ट्रकची तोडफोड केली गेली. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांची वक्तव्य देशाच्या ऐक्याला धोका देणारी आहे.

महाराष्ट्रानं संयम पाळला पण त्यालाही मर्यादा असतात. सीमावाद सोडवण्याचे तुमचे प्रयत्न यशस्वी होत नसतील तर पुढे जाऊन कुणी कायदा हातात घेतला तर त्याच्या परिणामांची जबाबदारी सरकारची असेल. केंद्रानं बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही, असा स्पष्ट शब्दांत शरद पवार यांनी दोन्ही राज्यांच्या सरकारला इशारा दिला आहे.

## दोन्ही राज्यांच्या प्रमुखांकडून अपेक्षाभंग

खरंतर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडूनच वादग्रस्त वक्तव्यांची सुरुवात झाली. पण त्यानंतरही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याशी संपर्क साधून वाद शमवण्यासाठी प्रयत्न करायला हवे होते. तेही काही होताना दिसलेलं नाही. आता दिवसेंदिवस वाद चिघळत आहे. दोन्ही राज्यांच्या प्रमुखांकडून यावर चर्चा होऊन वाद शमवण्याची अपेक्षा होती. पण तसं काही होताना दिसत नाहीय. आता १९ डिसेंबरपासून कर्नाटकचं अधिवेशन होणार आहे. ही देखील पार्श्वभूमी आहे. बेळगावातील मराठी भाषकांवर दहशतीचं वातावरण तयार केलं जात आहे, असं शरद पवार म्हणाले.

# महापालिकेच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आज भारतरत्न डॉ.बाबासाहेबआंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाणदिनानिमित्ताने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी प्रार्थना केली.


यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, सभागृह नेते पक्ष नेते परेश ठाकूर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखापरिक्षक विनकुमार पाटील, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, यांच्या सह पालिकेतील विविध विभांगाचे विभाग प्रमुख, अधिकारी, माजी नगरसेवक, विविध संघटनाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाणदिनाच्या पार्श्वभूमीवरती पनवेल महानगरपालिकेच्यावतीने पुतळापरिसराची नुकतीच स्वच्छता करण्यात आली होती. तसेच आज सुशोभिकरण करण्यात आले आहे.

# करंजा बंदरातील मासेमारी बोटीला आग

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील करंजा येथे असलेल्या जेट्टी जवळ समुद्रात नांगरून ठेवलेल्या मासेमारी बोटीला काल मंगळवार दि. ६ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास आग लागली. बोटीमध्ये कामगार जेवण बनवित होते. त्या दरम्यान विस्तवाने पेट घेतल्याने सदर मासेमारी बोटीस आग लागल्याचे प्राथमिक अंदाज आहे. जवळ जवळ ७० लाखाचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.



सदरची मासेमारी बोट ही करंजा - बापदेवपाडा येथील रहिवाशी गजानन लक्ष्मण कोळी यांची हि बोट असून ...‌/२

# श्रीवर्धनच्या गाव - वाड्यांचा संपर्क पुन्हा तुटला ; नऊ गावांना एकाच नेटवर्कचा आधार

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरातील ९ गावांचा मोबाईलवरून होण-ारा संपर्क पुन्हा एकदा तुटला आहे. वारंवार होणाऱ्या नेटवर्कबाबतच्या अडचणीमुळे येथील मोबाईलधारकांना बीएसएनएल सेवा ही त्रासदायक बनली असून आता दुसरा पर्याय उरला नसल्याने ग्राहकांमधून कंपनी विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील कासारकोंड, धनगरमलई, नागलोली मधलीवाडी, नागल-ोली, नागलोली नवीवाडी, देवखोल, बोर्ला, बोर्ला रसाळवाडी, वावेपंचतन या एकूण ९ गावांना नेटवर्क सुविधा मिळावी यासाठी चार वर्षांपूर्वी बीएसएनएल कंपनीचे टॉवर याठिकाणी बसवण्यात आले. पण सुरुवातीपासूनच या यंत्रणेत सातत्याने बिघाड होत असल्याने हा दुर्गम भाग म्हणून येथील कर्मचाऱ्यांबरोबर अधिकाऱ्यांचे कायम दुर्लक्ष होत आहे.

तात्पुरती सेवा सुरळीत झाली की पुन्हा बिघाड झालेल्या यंत्रणाकडे कायम दुर्लक्ष होतं. त्यामुळे बीएसएनएलची दूरध्वनी सेवा कायमचीच खंडित होत राहिली. अद्यापही या सरकारी कंपनीच्या सेवेवर अवलंबून असलेला ग्रामीण भाग मात्र, त्रस्त झाला आहे.

या भागातून इंटरनेट सेवेचा मोबाईलधारक प्रचंड प्रमाणात वापर करीत आहेत. येथील गावांची १६०० हुन अधिक ...‌/२

# पनवेल बार असोसिएशनचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## एकूण ११ पदासाठी होणार चुरशीची निवडणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल तालुका बार असोसिएशनच्या व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांचा कालावधी पूर्ण झाला असून नवीन कार्यकारिणीसाठी सन २०२२ ते २०२५ या कालावधीकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष यांसह एकूण ११ पदांकरिता ही निवडणूक होणार आहे. २१ डिसेंबर रोजी सदर निवडणूक होणार असून त्याच दिवशी मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येणार आहे.**



पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.मनोज भुजबळ व व्यवस्थापन समितीचा तीन वर्षासाठीचा कालावधी पूर्ण झाला असून सन २०२२ ते २०२५ या कालावधीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. एच.जे.शेळके तसेच सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून ॲड.राजेश एस.पाटील व ॲड.शशिकांत के. म्हात्रे हे काम पाहणार आहेत. दि.६ डिसेंबर ते ८ डिसेंबर या कालावधीत नामनिर्देशनपत्र दाखल करावयाचे असून ९ डिसेंबर रोजी अर्जाची छाननी त्याचप्रमाणे १० व १२ डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठीचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

दरम्यान १२ डिसेंबर रोजी अंतिम उमेदवारी यादी जाहीर करण्यात येणार असून दि.२१ डिसेंबर रोजी पनवेल दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीमध्ये मतदान प्रक्रिया सायंकाळी ५ वाजेपर्यंत पूर्ण करण्यात येईल व त्याच दिवशी उशिरा निकाल जाहीर करण्यात येणार आहेत.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । महाड**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त आज हजारो आंबेडकरी अनुयायांनी महाड शहरातील चवदार तळे, राष्ट्रीय स्मारक येथे त्यांना अभिवादन केले.



सकाळी ६ वाजल्यापासूनच सुरुवात झाली होती. 'बाबासाहेब अमर रहे, अमर रहे' या घोषणेने आंबेडकरी अनुयायी चवदार तळे क्रांतीस्तंभावर येत होते. महाड तालुक्यातील काही गावांतील तरुणांनी भीमज्योतही आणल्या होत्या.

आ. भरतशेठ गोगावले यांच्यासह बाळासाहेबांची शिवसेनेचे पदाधिकारी, काँग्रेसचे रायगड जिल्हा वरिष्ठ उपाध्याक्ष हनुमंत जगताप यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, आर फआयचे महाड तालुकाध्यक्ष मोहन खांबे, सज्जन पवार, विश्वनाथ सोनावणे, विनायक हाटे, बौध्दजन पंचायत समितीचे अध्यक्ष अशोक जाधव, प्रभाकर खांबे, वंचितचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण, यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील असंख्य कार्यकर्ते, महाड नगरपालिकेच्या वतीने मुख्याधिकारी महादेव रोडगे आणि महाड नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश होता.

सकाळी ६ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत बाबासाहेबांना अभवादन करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांची रीघ लागली होती.

### शिवसेनेचा आंदोलनाला पाठिंबा

# पनवेलमध्ये विद्यार्थी वाहकांचा बंद

## स्कूल व्हॅन परवाना आणि शाळा संमती पत्र मिळत नसल्याने आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल विद्यार्थी वाहक संस्था आणि इतर स्कूल व्हॅन चालकांनी मंगळवारी एक दिवसाचा लाक्षणिक बंद पुकारला. स्कूल व्हॅन परवाना त्याचबरोबर शाळांचे संमती पत्र मिळत नसल्याने हा लढा उभारण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांनी पालकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. काही शाळांना तर सुट्टी द्यावी लागली. या संदर्भात परिवहन विभागाने समन्वय बैठक बोलून यासंदर्भात तोडगा काढण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांनी दिली. तर या आंदोलनाला शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पनवेल यांनी प्रत्यक्ष आंदोलन स्थळी भेट देऊन पाठिंबा पत्र दिले आहे .



विद्यार्थी वाहक संघटनेच्या उपो-षणास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पनवेल शहराच्या वतीने जाहीर पाठिंबा पत्र संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांना तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बढे, तालुकाप्रमुख विश्वास पेटकर, शहर प्रमुख प्रवीण पोपटराव जाधव, शहर संघटिका सौ. अर्चना अनिलकुमार कुळकर्णी, मा. नगरसेवक विश्वास म्हात्रे, उपशहर प्रमुख रोहित (सनी) टेमघरे, शाखाप्रमुख शुभम माळी,उपशाखाप्रमुख राकेश भगत, कुणाल कुरघोडे, संजय झुगे आदींनी दिले . पनवेल परिसरामधील विशेष करून सिडको वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात खाजगी शिक्षण संस्था आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेतात. मोठ्या संख्येने विद्यार्थी स्कूल व्हॅन मधून शाळेत येजा करतात. या विद्यार्थी वाहक वाहनांना परिवहन विभागाकडून परवान्यासाठी शाळांची संमती पत्र बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र शाळा व्यवस्थापनाकडून टाळाटाळ केली जात आहे. यामुळे पनवेल आरटीओ कडून परवाने आडून धरण्यात आले आहेत. ...‌/२

### ७०० स्कूल व्हॅन चालक एकवटले

पनवेल परिसरातील एकूण ७०० स्कूल व्हॅन चालक या लाक्षणिक बंद मध्ये सहभागी झाले. कर्नाळा स्पोर्टस अकादमीच्या पाठीमागील मैदानात सर्व विद्यार्थी वाहक एकवटले. त्यांनी आपल्या न्याय हक्कासाठी घोषणाबाजी केली. त्याचबरोबर परवाना नूतनीकरणाबाबत होत अस-लेली ससेहोलपड आणि शाळांकडून घेण्यात येणाऱ्या आडमुठ्या भूमिकेचा त्यांनी निषेध नोंदवला.

### तोडगा न निघाल्यास तीव्र आंदोलन करणार

पनवेल विद्यार्थी वाहक संस्था आणि इतर विद्यार्थी वाहकांच्या मागणीचा गांभीर्याने विचार न केल्यास त्याचबरोबर शाळा व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका न घेतल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल असा इशारा पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या वतीने देण्यात आला आहे. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

# कशेडी घाटातील दरीत कार कोसळली ; ६ जखमी



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर कशेडी घाटात मुंबईकडून खेडच्या दिशेने कार घेऊन जाणाऱ्या चालकाचे नियंत्रण सुटून कार दरीत कोसळली असल्याची घटना मंगळवार, ६ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास धामणदिवी गावाच्या हद्दीत घडली आहे.

मुंबई गोवा महामार्ग क्र. ६६ धामणदिवी दत्तवाडी येथे ठिकाणी घाटकोपर ते पळचिल जाणारी इर्टीगा कार क्र.एमएच०३ बीजे ०६७१ वरील चालक सतीश जगताप वय-३५ वर्षे, रा.संभाजीनगर, कुर्ला, मुंबई यांचा वाहनावरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या डाव्या बाजूस रस्ता सोडून कार खाली उतरून दरीमध्ये पलटी ...‌/२

# कडाव येथील तरूणावर पाच चेहरेबंद तरूणांकडून जिवघेणा हल्ला

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील मौजे कडाव येथिल तरूणावर पाच चेहरेबंद तरूणांकडून जिव घेणा हल्ला झाला असल्याची घटना घडली असुन, सदर घटना ही राजकीय वैमन्यस्यातून झाल्याचे बोलले जात आहे. तर सदर हल्ल्यात जखमी झालेल्या तरूणाचे नांव हे रातिश पवार असे आहे.

मौजे कडाव येथिल तरूण रतिश पवार याला आलेल्या फोननुसार कडाव येथिल नाक्यावर बोलावल्या प्रमाणे रतिश पवार हा नाक्या ठिकाणी आला असता, रतिश याला चेहरेबंद पाच तरुणांनी दुपारचे अंदाजे २.०० ते ३.०० वाजण्याचे सुमारास आड बाजूस नेऊन फावडा व पिकाऊ यांच्या डांडक्याचे साह्याने जीव घेणा हल्ला करून, सदर घटना स्थळावरून चेहरेबंद तरूणांनी घटना स्थळावरून पळ काढून गेले. तर सदर पळ काढलेले चेहरेबंद तरुणांपैकी तीन तरूण हे बाहेर ग़ावातील तर दोन हे कडाव गावातील असल्याचे ही बोलले जात आहे. तर सदर ...‌/२

# पनवेल शहर पोलीसांनी केले सराईत मोटारसायकल चोरट्यास गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर परिसरात मोटार सायकली चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलीसांनी गजाआड केले असून त्यांच्या कडून चोरीच्या दोन मोटार सायकली हस्तगत केल्या आहेत .

गेल्या काही दिवसापासून पनवेल शहर परिसरात मोटारसायकल चोरीचे प्रमाण वाढले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सपोनि गणेश दळवी, पोउपनि अभयसिंह शिंदे, पोहवा नितीन वाघमारे, पोहवा अविनाश गंथडे, पोहवा रविंद्र राऊत, पोना अशोक राठोड, पोना अमोल पाटील, पोना संतोष मिसाळ, पोना विशाल दुधे, पोना परेश म्हात्रे, पोना महेंद्र वायकर, पोना रविंद्र पारधी, पोशि विवेक पारासुर, पोशि प्रसाद घरत आदींच्या पथकाने पनवेल परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी सापळा रचून पळस्पे दत्त सँक समोर गाडी चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपी इम्रान शहा ( वय ३६ ) रा. पेठ गाव याला ताब्यात घेऊन त्याच्या कडून पनवेल रेल्वे स्टेशन समोर उभी केलेली शशिकांत पाटील यांची मोटारसायकल व बुधाराम चौधरी यांची पी. के वाईन शॉप समोरील मोटारसायकल चोरीस गेल्या होत्या. त्या गाड्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

# शरद पवार यांच्या वाढदिवस, संसदीय कार्याला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने फुंडे -उरण येथील वीर वाजेकर कॉलेजमध्ये विविध कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । उरण**

भारताचे माजी कृषिमंत्री, पद्मविभूषण खासदार शरद पवार यांचा वाढदिवस आणि संसदीय कार्याला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने फुंडे –उरण येथील वीर वाजेकर कॉलेजमध्ये अर्ध मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.११ डिसेंबर रोजी विविध वयोगटात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत रयतेच्या ४७ शाळा युनिटमधील सुमारे दोन हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत.रयत संस्थेकडून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत दिली.

रायगड,ठाणे, पालघर, मुंबई उपनगरातील रयतेच्या ४७ युनिटमध्ये सुमारे ६७००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.शरद पवार यांचा वाढदिवस आणि संसदीय कार्याला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रयतच्या विविध शाळांमध्ये महारांगोळी , निबंध, वकृत्व स्पर्धा तसेच विज्ञान प्रदर्शन, आरोग्य शिबीर, वृक्षारोपण आदी कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. तर शरद पवार यांच्या जीवनावर व्याख्यान होणार आहे.कामोठे येथील शाळेत शरद पवारांची २०० बाय २०० स्केअर फुटांची महाभव्य अशी पोर्ट्रेट महारांगोळीही काढण्यात आली आहे.११ डिसेंबर रोजी विविध वयोगटात आयोजित करण्यात आलेल्या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन सुप्रसिद्ध खेळाडू ललिता बाबर, कविता राऊत यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या आयोजित कार्यक्रमाची सांगता विष्णूदास भावे नाट्यगृहात होणार आहे.याप्रसंगी शास्त्रज्ञ अनिल काकोडकर उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव, व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठीही या विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार बाळाराम पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. याप्रसंगी प्राचार्य डॉ.पी.जी.पवार,रायगड विभागाचे इन्स्पेक्टर आर.पी.ठाकूर, महाविद्यालयाचे चेअरमन सुधीर घरत व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.



## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा मालकी, वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड, तलाठी सजा : मोर्बे हद्दीतील**

| मालकाचे नाव | गट/ भूमापन क्रं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे | भोगवटदार वर्ग–२ |
|---|---|---|---|---|
| विठ्ठल शंकर नावडेकर | १६८/४/२/अ | ०–८०–०० एकूण ०–८०–०० | १.६० | |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला असून वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझिशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असल्यास ही जहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

हे कळावे
दि.०७/१२/२०२२
ठिकाण : कळंबोली

सही/–
**ॲड.सुनील एन. मोरे**
**ऑफिस नं.३०६०, सी–विंग, बिमा कॉम्प्लेक्स प्रिमायसेस, प्लॉट नं.११९, सेक्टर–के डब्ल्यू सी कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८**
**मो.८३६९४६५७९९/९९२०४५५७२७**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा मालकी, वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड, तलाठी सजा : वावंजे हद्दीतील**

| मालकाचे नाव | गट/ भूमापन क्रं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे | भोगवटदार वर्ग–२ |
|---|---|---|---|---|
| वासुदेव मारुती दाढावकर | ७०/२/अ | ०–३०–४० एकूण पो.ख.०–०२–४० एकूण ०–३२–८० | ५.३१ | |
| एकूण ०–३२–८० या सामाईक क्षेत्रापैकी ०–२२–०० एवढे क्षेत्र | | | | |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला असून वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझिशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असल्यास ही जहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

हे कळावे
दि.०७/१२/२०२२
ठिकाण : कळंबोली

सही/–
**ॲड.सुनील एन. मोरे**
**ऑफिस नं.३०६०, सी–विंग, बिमा कॉम्प्लेक्स प्रिमायसेस, प्लॉट नं.११९, सेक्टर–के डब्ल्यू सी कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८**
**मो.८३६९४६५७९९/९९२०४५५७२७**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## करंजा बंदरातील मासेमारी बोटीला आग

आग लागल्यावर आगीचा प्रचंड भडका उडाला. या आगीमुळे आजूबाजूच्या परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. सदर घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलामार्फत आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतेही जीवितहानी झाली नाही. मात्र बोट जळून खाक झाली. करंजा बंदरात या अगोदरही अशा मासेमारी बोटीना आग लागण्याचे प्रकार घडले असून करंजा बंदरातील बोटीच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## श्रीवर्धनच्या गाव – वाड्यांचा संपर्क पुन्हा तुटला

लोकसंख्या आहे. यातील अनेकजण कामानिमित्त मुंबईस्थित असल्याने कित्येक वेळा या आडमार्गावर कोणतीच सुविधा मिळत नाही. अचानक तसा प्रसंग बेतला तर रात्रीबेरात्री कोणत्याही मदतीसाठी आजूबाजूंच्या गावांकडे संपर्क साधावा लागतो. मात्र, अशा वेळेला संपर्क होत नसल्याने कंपनीच्या सेवांना स्थानिक नागरिक वैतागल्याचे दिसत आहे.

## कशेडी घाटातील दरीत कार कोसळली ; ६ जखमी

झाली. या अपघातात कारमधून वाहन चालकासह ७ व्यक्ती प्रवास करीत होते.

यामध्ये चालक सतीश जगताप हा गंभीररित्या जखमी असून दिपाली कर्नाळे वय ६५ वर्षे, दामोदर कर्नाळे वय ७० वर्षे, साक्षी कर्नाळे वय ४२, स्वराज कर्नाळे वय १२, राजेश कर्नाळे ३८ या पाचही जणांना किरकोळ दुखापत झाल्याने सर्वांना तात्काळ पोलादपूर ग्रामीण रुग्णालय येथे औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या अपघाताची माहिती समजतात कशेडी महामार्गाचे पोलीस उपनिरीक्षक अनिल चांदणे, सहाय्यक फौजदार यशवंत बोडकर यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

## कडाव येथील तरूणावर पाच चेहरेबंद तरूणांकडून जिवघेणा हल्ला

हल्लूयात गंभिर जखमी झालेल्या रतिश पवार याला उपचारासाठी स्थानिक तरूणांनी उपजिल्हा रुग्णालय कर्जत येथे दाखल केले असता. गंभिर स्वरूपाची दुखापत असल्याने त्याला पुढील उपचारासाठी पनवेल येथिल रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर सदर हल्ला हा राजकीय वैमान्यशातून झाल्याचे बोलले जात असुन, रतिश पवार हा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचा कार्यकर्ता असल्याचे बोलले जात असल्याने, सदर हल्ला हा वैयक्तिक की राजकीय वादातून झाला आहे का? असा प्रश्न उपस्थित होत असुन, तशी दबक्या आवाजात चर्चा देखिल सुरू आहे. रतिश पवार यांच्या वर झालेल्या जिवघेणा हल्लूयाने कडाव गावातील वातावरण हे सध्या तापले असुन, सदर हल्लूया प्रकरणी कर्जत पोलिस हे अधिकचा तपास करीत आहेत.

## पनवेलमध्ये विद्यार्थी वाहकांचा बंद

या कारणाने जवळपास २५ ते ३० हजार विद्यार्थ्यांची असुरक्षित वाहतूक करावी लागत आहे. परवाने नसल्याने इन्शुरन्स सुद्धा काढता येत नाही. त्यामुळे विद्यार्थी वाहक खूप मोठ्या पेचामध्ये सापडले आहेत.६ डिसेंबर रोजी आमरण उपोषणा बरोबरच वाहतूक बंद ठेवण्याचा इशारा पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या वतीने देण्यात आला होता. मात्र सोमवारी यासंदर्भात शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी शिष्टाई करून एका बैठकीचे आयोजन केले. यामध्ये उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील उपस्थित होते. त्यांनी परिवहन विभागातील वरिष्ठ त्याचबरोबर शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून हा प्रश्न निकाली काढण्याच्या अनुषंगाने विशेष बैठक बोलवण्याबाबत भूमिका विशद केली.

त्यानुसार येत्या ८ डिसेंबर रोजी पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय, रायगड जिल्हा शिक्षण अधिकारी आणि शाळा व्यवस्थापनाची तातडीची बैठक बोलवली आहे. त्यामुळे पनवेल विद्यार्थी वाहक संस्था आणि इतर संलग्न विद्यार्थी वाहकांनी आपले आमरण उपोषण पुढे ढकलले. मात्र मंगळवारी एक दिवसाचा लाक्षणिक बंद पुकारून शासकीय यंत्रणा आणि शाळा व्यवस्थापनाला इशारा देण्यात आला. मंगळवारी पुन्हा एकदा प्रादेशिक परिवहन कार्यालयात विद्यार्थी वाहकांना निमंत्रित करून लेखी पत्र त्यांना देण्यात आले.

# बारमाही वाहणारी खोपोलीची गंगा अतिक्रमणामुळे झाली पातळ



**दै.रायगड नगरी । खोपोली**

कोकण म्हटले की, चहुबाजूला हिरवळ आणि आपल्याच डोलात चालणारी नदी असे चित्र उभे राहते आणि कोकणाचे प्रवेशद्वार म्हटल्या जाणाऱ्या खोपोली शहरासह खालापूर तालुक्याला देखील हेच वरदान मिळाले आहे. पण पाटबंधारे विभागाच्या अकार्यक्षम अधिकाऱ्यांमुळे हेच वरदान हळूहळू नेस्तनाबूत होणाच्या मार्गावर पोहचले आहे.

खालापूर व कर्जत तालुक्यात बिनधास्त नदी, नाल्यांमध्ये अतिक्रमण होत आहे. या अतिक्रमणाची खडान्खडा माहिती पाटबंधारे विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना आहे. साहेबांनी या स्थळांचा दौराही केला असल्याचे समजते पण ज्या तावातावात साहेब या ठिकाणी भेट देतात त्यापेक्षा कैकपटीने शांत व समाधानी मुद्रेने या ठिकाणातून ते बाहेर पडतात व अतिक्रमण आहे तसेच पुढेही डौलाने उभे राहते. एखाद्याने तक्रार देवून साहेबांच्या शांततेचा भंग केलाच तर तक्रारदारावर उपकार म्हणून कर्जत उपअभियंता साहेब अतिक्रमणधारकाला नोटीस बजावतात. तरीही नदी नाल्यांतील अतिक्रमण गेली अनेक वर्ष 'जैसे थे'च आहे. पाटबंधारे विभागाच्या याच कार्यतत्परतेमुळे दररोज खालापूर व कर्जत तालुक्यात बिनधास्त नदी नाल्यांमध्ये अतिक्रमण होत आहे आणि साहेब मस्तमौला नोकरी उपभोगत आहेत.

खालापूर तालुक्यात असेच एक प्रकरण समोर आले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार महड हद्दीत पातळगंगा नदी शेजारी शासकीय विहीर खोदण्याचे काम सुरू आहे. ब्लास्टींग करीत जनतेच्या पिण्याचा प्रश्न मार्गी लावला जात आहे. पण विहीर खोदतांना निघणारी दगडमाती मात्र नदीपात्रात टाकत मोठया प्रमाणावर भराव करण्यात आला आहे. शासकीय असो की खासगी...कोणत्याही कामातून अथवा कोणत्याही कारणास्तव नैसर्गिक नदी, नाले बुजविता येत नाहीत. परंतु कर्जत उपविभागाला मिळालेले अतिशय कर्तव्यदक्ष व इमानदार अधिकाऱ्यांमुळे खोपोली, खालापूर व कर्जत तालुक्यात बिनधास्त नदी नाल्यांमध्ये अतिक्रमण होत आहे.

कर्जतचे प्रमुख अधिकारी अजून दहा वर्ष असेच कर्तव्यदक्ष व इमानेइतबारे काम करीत राहिले तर येणाऱ्या पिढीला खालापूर व कर्जत तालुक्यातील नद्या दुर्बिणीतून शोधाव्या लागतील. पातळगंगा नदीत ऐवढा मोठा भराव झालेला असताना गुंटुरकर साहेबांना याबाबत काहीच माहित नसल्याचे समजते. पत्रकारांनी याबाबत माहिती घेण्यासाठी फोन केला असता ही माझी जबाबदारी नसून रायगड जिल्हाधिकारी यांची जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी पल्ला झाडला.

गुंटुरकर साहेबांच्या काळात सर्वाधिक अतिक्रमणे झाली असल्याची देखील माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. दरम्यान, पातळगंगा नदीत सुरू असलेल्या भरावाची चौकशी होणार का? खालापूर पाटबंधारे विभाग, खालापूर तहसीलदार, कर्जत प्रातांधिकारी, रायगड जिल्हाधिकारी या अवैधरित्या करण्यात आलेल्या भरावाची नोंद घेणार का? की काही पैशांच्या बळावर पातळगंगा नदीतील अतिक्रमण कायदेशीररित्या वैध ठरतील? पातळगंगा नदी अशीच दिवसेंदिवस कमी कमी होत जाणार का? या परिसरात करण्यात आलेल्या अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी काही हालचाल करणार का? की चोरीचा मामला आणि हळूहळू बोंबला असाच प्रकार होणार, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

पातळगंगा नदी करण्यात आलेल्या या भरावामुळे नदी क्षेत्र कमी झाले. ऐवढेच नव्हे तर मासेमारीवर देखील याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तरी यासह कर्जत व खालापूर तालुक्यातील नदी नाल्यांमध्ये झालेले अतिक्रमण पाटबंधारे विभाग, खालापूर तहसील कार्यालय व रायगड जिल्हाधिकारी हटविणार का? की इतर अधिकाऱ्यांप्रमाणेच तेही मूग गिळून गप्प बसतील. नदी नाल्यांमध्ये होणाऱ्या अतिक्रमणांवर वेळीच कारवाई करण्यात आली नाही तर पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होवून ठिकठिकाणी पावसाचे पाणी शिरण्यास वेळ लागणार नाही.

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगितले वरुन त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते ते खालीलप्रमाणेः–

**मौजे : परहुर, ता.अलिबाग, जि.रायगड**
**हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत**

| सर्व्हे/गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| २३५ | १ | ०.२०.८० | ०.३७ |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशी मिळकत माझे अशिल सौ.समिता नंदकिशोर भगत, मु.परहुर, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती.रंजना हरिश्चंद्र पाटील व श्री.हरिश्चंद्र पंढरीनाथ पाटील दोहो मु.परहुर, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेपासून खरेदी घेणेबाबत बोलणी केली असून मिळकतीचे विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे अशिल यांस दिला असून मिळकतीच्या मालकी हक्काची तपासणी करण्यास संमती दिली आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, दान, कब्जा, वहिवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाटस वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यस मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ५/१२/२०२२

सही/–
**(ॲड.एस.वाय.बारटके)**
**मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.विसा डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.अनिल दत्ताराम भोईर, २) श्री.अनिरुद्ध अनंत घरत, पत्ता : प्लॉट नं.५०४, सेक्टर–२४, उलवे, नवी मुंबई–४१०२०६ ह्यांनी हे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेला भूखंड पुर्नवसन व पुर्नस्थापना योजनेप्रमाणे खालील वाटप करण्यात आलेला भूखंड मुळ मालक १) श्री.गजानन नारायण म्हात्रे २) कै.नारायण चांगू म्हात्रे कायदेशीर वारस समाधान नारायण म्हात्रे रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ ह्यांचेकडून पुर्नवर्सन व पुर्नस्थापना योजनेप्रमाणे खालील भूखंड मिळालेला आमचे अशिल यांना सदरहू भूखंड परस्पर सामंजस्य कराराने विकसित करण्याचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे :वहाळ पुष्पकनगर, ता.पनवेल, जि.रायगड**
**सिडको संचिका नं.३४३७**

| गावाचे नाव | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | ४८१ | २४ | १६९.८८ चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकती संबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिअन, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, र्निजोखमीची आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून आलेल्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.०६/१२/२०२२

सही/–
**सुनिता राम पाटील**
Advocate & Notary Public
(M.Com, M.A., L.L.M., G.D.C. & A)
Shop No.26, Sec-1 A, Prabhat Center
CBD-Belapur, Navi Mumbai-400614
9867688788 (SMS Whatsapp only)

# आज पनवेल-कुंभारवाडा येथे श्री.दत्त जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील कुंभारवाडा येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी आज श्री.दत्त जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ॐ चैतन्य नवनाथ मित्र मंडळ, कुंभारवाडा युवक मंडळ व राजमुद्रा मित्र मंडळ कुंभारवाडा पनवेल यांच्याकडून देण्यात आली आहे.



नवनाथ मंदिर कुंभारवाडा, मिरची गल्ली पनवेल येथे संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमप्रसंगी सकाळी ८ वाजता श्री दत्त अभिषेक, संध्याकाळी ७ वाजता श्री दत्त–ाजन्म उत्सव सोहळा व महाआरती, रात्री ८ वाजता भावगीत व भक्तीगीतांचा सुमधूर ऑर्केस्ट्रा तसेच महाप्रसाद (भंडारा) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : चिंचवली तर्फे वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चिंचवली तर्फे वाजे | नरेंद्र सुभाष पाठारे | १०६ | ०–०७–०० पो.ख.०–०१–८० एकूण ०–०८–८० | ०.२२ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ६/१२/२०२२

सही/–
**ॲड.महेश भगत**
**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनेवल–पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**
**मोबा नं.९२२२२७५००१**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आज देवकान्हे-पिंपळवाडी येथे श्री.दत्त जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील देवकान्हे-पिंपळवाडी येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी आज श्री.दत्त जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे.

ह.भ.प.पुरूषोत्तम महाराज पाटील,वाटावं यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली श्री.दत्तकृपा मंडळ पिंपळवाडी देवकान्हे यांच्या वतीने संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमप्रसंगी श्री.गुरूदेव दत्तात्रेय जन्मोत्सव,सायं.६ ते ७ रोहा कोंकण दिंडी वारकरी सांप्रदाय यांचे हरिपाठ,८ ते ९ हरिपाठ,तर रात्रौ.९ ते ११ ह.भ.प.दिनेश महाराज कडव(वांदोळी) यांची हरिकिर्तनरूपी आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी पिंपळवाडी देवकान्हे ग्रामस्थ व महिला तसेच तरूण मंडळाचे सदस्य मोलाचे सहकार्य करीत आहेत.

## प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेअंतर्गत लाभधारक शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेअंतर्गत लाभधारक शेतकऱ्यांनी दि.१५ डिसेंबर पर्यंत ई-केवायसी करून घ्यावी.असे आवाहन मुरुड तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

पी.एम.किसान सम्मान निधी योजनेअंतर्गत नावनोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रमाणीकरण करणे अनिवार्य करण्यात आले आहे.यासाठी केंद्र सरकारने दि.१५ डिसेंबर २०२२ ही अंतिम मुदत दिलेली आहे.

तरी या योजनेअंतर्गत लाभ घेत असलेला शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी.असे आवाहन मुरुड तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# ई रिक्षामुळे विद्यार्थ्यांसह पालकांची थांबली पायपीट ; रुग्णांची झाली सोय

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शैक्षणिक दृष्ट्या ई रिक्षा हा एकमेव भाग बनला असून तीन ते चार किलोमीटरची लहान लहान मुलांना शाळेत नेण्यासाठी पालकांसह विद्यार्थ्यांची पायपीट आजपासुन थांबली असून आज रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने ई रिक्षाच्या माध्यमातून तीन रुग्णांना लाभ घेता आला आहे. ई रिक्षा ही सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर चालवली जाणार आहे. त्यानंतर होणारे फायदे तोटे लक्षात घेऊन सर्वासाठी कायमस्वरूपी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सध्यातरी दस्तुरी नाक्यापासून रेल्वे स्टेशन पर्यंत ही सेवा सुरू आहे. यामध्ये स्थानिकांसह, पर्यटकांना आपल्या सामानासह वाहतूक करता येणार आहे.पहिल्याच दिवशी आज शाळेच्या विद्यार्थ्यांना रिक्षात सोडण्यासाठी पालकांची गर्दी दिसत होती. दूरवर असणाऱ्या शाळेत जाण्यासाठी पायपीट थांबल्याने पालकांनी सुटकेचा निश्वास सोडला असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे.



सकाळच्या दरम्यान एका मुलीला सर्पदंश झाला त्यावेळी रुग्णवाहिका उपलब्ध नव्हती त्यावेळेस अत्यावश्यक सेवा म्हणून याच ई रिक्षाचा दवाखान्यापर्यंत वापर करण्यात आला.एकूण तीन रुग्णांना याचा लाभ घेता आला आहे.

यावेळी संगीता सुतार म्हणाल्या की, सेंट झेव्हीयर हायस्कुल इंदिरा नगर पासून ३ किलोमीटर लांब असल्या कारणाने लहान मुलांना दप्तराचे ओझे घेऊन शाळेत जाताना खुपच दमछाक होत होती.आम्हा पालकांना दप्तर घेऊन आपल्या मुलाना सकाळी शाळेत सोडायला जाताना खुपच भारी पडत असे पावसाळ्यात उन्हाळ्यात गरमीच्या दिवसात खुप त्रास होत होता,ई रिक्षा सुरु झाल्याने आणि ई रिक्षाचा दर ही कमी असल्याने खुप मनाचे ,शारीरिक , ओझे कमी झाले आहे.यासाठी प्रयत्न करणारे सुनील शिंदे सर,प्रशासक सुरेखा भणगे यांचे मनापासून धन्यवाद मानले.

तर अन्वर शेखर म्हणाले की, मी जेष्ठ स्थानिक नागरीक वय (७५) आजारी असून आजच मुंबई वरून दवाखान्यातुन दस्तुरी नाक्यावर आलो आणि माझ्या स्वप्नातील हीच ती ई रिक्षा ज्यातून प्रवास करण्याची माझी प्रबळ इच्छा होती ती केवळ सुनील शिंदे यांच्या प्रयत्नामुळे शक्य झाली आहे.या सेवेचा लाभ मला आज घेता आला यामुळे मी खूपच समाधान व्यक्त करतो.

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कर्जत शहराच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**दै.रायगड नगरी । कर्जत**




हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने कर्जत शहराच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. कर्जत शहर संपर्कप्रमुख संजय मोहिते, शहर प्रमुख निलेश घरत, शहर संघटक मुकेश पाटील, शहर समन्वयक सुदेश देवघरे,शहर सचिव सुरेश भरकले, उपशहर प्रमुख कर्जत विभाग विनोद पांडे, उपशहर प्रमुख दहिवली - आकुर्ले विभाग प्रसाद डेरवणकर, उपशहर प्रमुख भिसेगाव - गुंडगे विभाग महेंद्र कानिटकर, उपशहर प्रमुख मुद्रे - नानामास्तर नगर प्रमोद खराडे, उपशहर संघटक दहिवली - आकुर्ले विभाग राजेंद्र मोडक, उपशहर संघटक कर्जत विभाग दीपक आंबवणे, उपशहर संघटक मुद्रे विभाग मुकुंद मोधळे, उपशहर संघटक भिसेगाव - गुंडगे अभिजित बडेकर, विभाग प्रमुख - कर्जत निलेश हरिश्चंद्रे, विभाग प्रमुख - कर्जत आरिफ चौगुले, विभाग प्रमुख भिसेगाव जगदीश दिसले, विभाग प्रमुख गुंडगे पंकज पवार, विभाग प्रमुख दहिवली प्रशांत दिघे, विभाग प्रमुख आकुर्ले भरत भुरे, विभागप्रमुख मुद्रे भीम मुसळे यांची नेमणूक करण्यात आली आहे

यावेळी रायगड जिल्हा संघटिका, कर्जतच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, तालुका संघटक करुणा बडेकर आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैजनाथ येथे श्री बापुजी महाराज मंदिर जिर्णोद्धार व कळस पूजन सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील वैजनाथ येथे शनि.दि.१० डिसें.व रवि. दि.११ डिसें.रोजी श्री बापुजी महाराज मंदिर जिर्णोद्धार व कळस पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगडचे खा.सुनील तटकरे व सर्वदर्शनाचार्य महंत विवेकानंद शास्त्री यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत संपन्न होणाऱ्या या सोहळ्याप्रसंगी आ.आदिती तटकरे,आ.अनिकेत तटकरे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार असून यावेळी जेष्ठ नेते मोतीराम तेलंगे, नारायण धनवी, रामचंद्र चितळकर,प्रकाश थिटे, बाबूराव बामणे,गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे,जि.प.सदस्य दयाराम पवार,सुरेश महाबळे,प्रितम पाटील,विणा चितळकर,राकेश शिंदे, नरेंद्र जाधव,राम मरवडे, मनोज शिर्के,विजय कामथेकर, सुप्रिया जाधव, वसंत मरवडे,राम कापसे, सुशील शिंदे,भाई पोटफोडे, वसंत भोईर,सूरज कचरे, नरेंद्र पवार,संजय मांडलुस्कर, सरपंच मानसी चितळकर आदींसह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यातंर्गत शनि. दि.१० रोजी दु.३ ते ६ वास्तूपूजन,६ ते ७ देवाची मिरवणूक,७ ते १० श्रींच्या जलाधिवास-धान्यधिवास-निद्राधिवास आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत.तर रवि. दि.११ रोजी स.७ ते ११ होम-हवन व प्राणप्रतिष्ठा,११:३० ते १२:३० महंत विवेकानंद शास्त्री यांच्या हस्ते कळशरोहन व ध्वजारोहन,दु.१ ते २ श्री.सत्यनारायणाची महाप-ूजा, संध्याकाळी हरिपाठ व महाप्रसाद,तर रात्रौ.९:३० वा.महंत विवेकानंद शास्त्री सर्वदर्शनाचार्य यांचे हरिकिर्तन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ वैजनाथ, नवतरुण मित्र मंडळ, एकता फाऊण्डेशन मित्र मंडळ वैजनाथ,आदी मेहनत घेत आहेत.

## बुधवारी तळोजात 'अभंगवाणी'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सद्गुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्री नवनाथ सेवा मंडळ (योगीनगर, धोंडळी) यांच्या वतीने श्रीगुरुचरित्र पारायण सप्ताह व श्रीदत्त जयंती उत्सव सोहळा बुधवार दिनांक ०७ डिसेंबर रोजी होणार असून या उत्सवात रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाचा 'अभंगवाणी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रामकी कंपनीच्या शेजारी असलेल्या श्रीस्वामी समर्थ मठ योगिनीगर येथे होणाऱ्या सोहळ्यात काकड आरती, नित्यपूजा, महारुद्र अभिषेक व दत्तयाग होणार आहे. संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्राला संस्कृती आणि कलेचा वारसा आहे. त्यामुळे विविध क्षेत्रातील कलाकारांची मांदियाळी आहे. अशातच अनेक तप संगीत साधनेची सेवा करणारे या भूमीला लाभले आहेत. त्याचप्रमाणे पंडित संगीत विशारद पंडित उमेश चौधरी गेल्या २० वर्षांहून अधिक काळ संगीत क्षेत्राची सेवा करीत आहे. त्या अनुषंगाने त्यांच्या शास्त्रीय गायनाचा ' अभंगवाणी' हा कार्यक्रम दुपारी १२. ३० वाजता या सोहळ्यात होणार आहे.

## एटीएम कार्ड अदलाबदल करून १३ हजार रुपयांची केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एटीएम कार्डची हातचलखीने अदलाबदल करून १३ हजार रुपयांचा अपहार केल्याची घटना तालुक्यातील ढोंगऱ्याचापाडा ऍक्सिस बँकेच्या एटीएम सेंटर मध्ये घडली आहे. दीपककुमार मुखिया ( वय २३ ) हे त्यांच्या मामाचे आयडीबीआय बँकेचे एटीएम घेऊन ढोंगऱ्याचापाडा ऍक्सिस बँकेच्या एटीएम सेंटर मध्ये आले मशीन मधून पैसे काढत असताना दोन अज्ञात इसम त्या ठिकाणी आले व त्यांनी दीपककुमार यांना बोलण्यात गुंगवून हातचलाखीने एटीएम कार्ड ची अदलाबदली केली व त्या कार्डचा वापर करून १३ हजार रुपये काढून घेऊन अपहार केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

---

मे.पांडे साहेब यांच्या कोर्टात

अ‍ॅड.रसिका नरेश भगत

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज क्र.१०८६/२०२२

ने.ता.२८/१२/२०२२

श्री.ज्ञानेश्वर चिंतामण म्हात्रे
वय : ६६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.मु.पो.कातकरवाडीजवळ, कुंडेवहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी /
निबंधक जन्म मृत्यू नोंदणी विभाग
ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन कोड ४१०२०६ सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवाशी असून अर्जदार यांनी त्यांचे आजोबा कै.अंबाजी चाहू वासकर हे अर्जदार यांचे आजोबा असून कै.अंबाजी चाहू वासकर हे मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी होते व कै.अंबाजी चाहू वासकर ह्यांचा मृत्यू दि.१०/०१/१९६२ रोजी मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे व त्याबाबत अर्जदार यांनी मृत्यूचा दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज केला आहे.

अर्जदारांचे मागणीप्रमाणे कै.अंबाजी चाहु वासकर यांच्या मृत्यूचा दाखला अर्जदार यांना देणेबाबत कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दि.२८/१२/२०२२ रोजी पर्यंतचे आत लेखी / तोंडी हरकत दाखल करावी.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या आजोबांचा मृत्यूदाखला देणेबाबत योग्य ते आदेश करण्यात येतील याची दखल घ्यावी.

आज दि.६/१२/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- क.लिपीक फौ.न्याया., पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया., पनवेल

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : लोहोप, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत श्रीमती.सिताबाई राम पाटील यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : लोहोप, ता.खालापूर, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सिताबाई राम पाटील | १/१/अ/२ | ०-४३-७० पो.ख.०-२७-३० एकूण ०-७१-०० | ७-५६ |

मौजे : लोहोप, ता.खालापूर, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्रीमती. सिताबाई राम पाटील यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ५/१२/२०२२

सही/-
**मयुरेश प्र. हनुमंते**
**अ‍ॅडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग, ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

---

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.श्रीकांत तु. पाटील

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७७७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२३

१) श्री.सौरव नितीन बारिया
वय : २४ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
२) कु.जल्पा नितीन बारिया
वय : २३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
दोघे रा.घर क्र.४२३, राम मंदिर रोड,
पाटील पाडा, खारदांडा, मुंबई अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. ज्योती नितीन बारिया ह्या दि.१०/०७/२०२२ रोजी के.बी.भाभा हॉस्पिटल, मुंबई येथे मयत झाल्या असून त्यांच्या आई कै.अंजली लालजी तलवाडीया ह्या दि.१९/०४/२०१५ रोजी मु.खारदांडा, मुंबई येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क्र.१ व २ ही कै.ज्योती नितीन बारिया यांची मुले आहेत व कै.अंजली लालजी तलवाडीया यांची नातवंडे असून कै.ज्योती नितीन बारिया यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांचे नावे असलेल्या मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्वेक्षण क्र. | घर क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | ULV-ICIG-242 | UL-491, UL-491 A | २८३ २८३ अ | १५२.७५ चौ.मी. |

वरील घर मिळकतीचे मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे सामाईक भूखंडाचे वाटप केलेले आहे.

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | २४ | ४२२ | ४६० चौ.मी. |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.ज्योती नितीन बारिया यांस संपादीत घर मिळकतीचे मोबदल्यात पुनःर्वसन व पुनःस्थापना योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड त्यांच्या पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार क्र.१ व २ यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.६/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

मा.गोडसे सो

अर्जदारातर्फे वकील
श्री.एन.ए.शेख

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४१८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०१/२०२३

१) श्रीमती.खुर्शिदाबेगम दस्तगीर
वय : ६७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.बी-३०४, स्वरुप को.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१६, सेक्टर ५ ई, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८
२) श्रीमती.राजीया बानु
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.हनिफा, ६४/W, मीलकाई थोतम,
कचिरापलायाम रोड, कल्लाकुरीची,
विल्लुपुरम, तमीलनाडु-६०६२०२
३) श्री.शेहजद अली दस्तगीर
वय : ३४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.रुम नं.३०४, बी-विंग, स्वरुप को.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१६, सेक्टर-५ ई, कळंबोली, ता.पनवेल
४) श्री.अशरफ अली दस्तगीर
वय : ३७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.रुम नं.३०४, बी-विंग, स्वरुप को.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१६, सेक्टर-५ ई, कळंबोली, ता.पनवेल अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, पै.दस्तगीर अब्दुल गनी हे दि.२३/०७/२०१८ रोजी नेरुळ, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत यांच्या खुद्द मालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे नमूद केलेली सदनिका आहे. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| सदनिका नं. | बिल्डींग/इमारतीचे नाव | क्षेत्र | पत्ता |
|---|---|---|---|
| सदनिका नं.३०४, बी- विंग, तिसरा मजला | स्वरुप को.हौ.सो.लि. | ३८.४७ चौ.मी. बिल्टअप एरिया | प्लॉट नं.१६, सेक्टर-१८, सेक्टर-५ ई, पनवेल, जि.रायगड |

वरील वर्णनाच्या सदनिका मयत पै.दस्तगीर अब्दुल गनी यांच्या मालकीची होती व आहे यांच्या मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता तसेच सदरहू मिळकत अर्जदार यांच्या नावे दाखल करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने योग्य व उचित असल्याने अर्जदार यांनी मयताचा वारस दाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील जमिनीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलामार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज दि.०६ माहे १२ सन २०२२ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अ‍ॅड.सुधीर एस. म्हात्रे

### जाहिर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.२१२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२२

१) श्री.चंद्रकांत नामदेव पाटील
वय : ५३ वर्षे, नोकरी
मु.पो.पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
२) कै.सुर्यकांत उर्फ सुरेश नामदेव पाटील (विवाहित मयत)
२.१) श्री.मिथुन सुर्यकांत उर्फ सुरेश पाटील
वय : २७ वर्षे, नोकरी
२.२) श्री.जयेश सुर्यकांत उर्फ सुरेश पाटील
वय : २६ वर्षे, नोकरी
२.३) हिरावती उर्फ हिराबाई सुर्यकांत उर्फ सुरेश पाटील
वय : ४८ वर्षे, नोकरी
अर्जदार नं.२.१ ते २.३ रा.मु.पो.घर नं.२५५,
पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
३) दिलीप नामदेव म्हात्रे
वय : ५६ वर्षे, नोकरी
मु.पो.पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
४) श्री.भास्कर नामदेव पाटील
वय : ५० वर्षे, नोकरी
मु.पो.पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
५) जगतमाता नामदेव पाटील उर्फ जगत पंढरी मढवी
वय : ४३ वर्षे, नोकरी
मु.पो.घर नं.११६ ब, मोठी जुई गाव, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ ह्यांचे आई / आजी / सासू कै.जनाबाई नामदेव पाटील ह्यांचा मृत्यू दि.८ डिसेंबर १९८४ रोजी पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथे झालेला. मयताचे पती कै.नामदेव दामोदर पाटील ह्यांचा मृत्यू दि.२३ सप्टेंबर १९८३ रोजी पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथे झालेला. त्यांचा मृत्यूदाखल्याची प्रत सोबत जोडलेली आहे. अर्जदार नं.२ हा मयताचा विवाहित मुलगा कै.सुर्यकांत उर्फ सुरेश नामदेव पाटील ह्यांचा दि.२४ जून २०२१ रोजी पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले. त्याअर्थी अर्जदार श्री.चंद्रकांत नामदेव पाटील व इतर ७ यांनी कै.जनाबाई नामदेव पाटील ह्यांच्या खालील वर्णनाच्या जमिनीचे बाबत कै.जनाबाई नामदेव पाटील ह्यांचे सदर अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत वारस सर्टीफिकेट मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पाणजे गाव, बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | फाईल नं. | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| पाणजे | द्रोणागिरी २३८६ | ७४/ १९८६-८७ | १३ | २० | ०-१७-१ | ३.१३ |

वरील अर्जदार हे मयत ह्यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.जनाबाई नामदेव पाटील यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करेल, याची दखल घ्यावी.

आज दि.०८/११/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

# संक्षिप्त...

## शासकीय अध्यापक महाविद्यालयात चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील शासकीय अध्यापक महाविद्यालात चोरी झाल्याची घटना घडली आहे.

या महाविद्यालयाच्या व्याख्यान हॉलच्या (सरस्वती हॉल) एका दरवाजाच्या लाकडी पट्ट्या काढून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून चार फॅन, एक लोखंडी खुर्ची, यू. पी. एस व चार स्टील चे नळ असा मिळून जवळपास ८ हजार २०० रुपये किमतीचा ऐवज छोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ट्रेलरच्या २ टायरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुरुस्तीचे काम चालू असलेल्या ट्रेलरचे वीस टायर काढून ठेवले असता त्यापैकी २ टायरची चोरी झाल्याची घटना पनवेल जवळील पंकज पार्किंग जे. एन.पी. टी रोड येथे घडली आहे. ट्रान्सपोर्टर जितेंद्र गुप्ता यांच्या ट्रेलर क्रमांक एम. एच. ४६ एच ३७८८ चे दुरुस्ती काम चालू असल्याने सदर ट्रेलर चे वीस टायर पंकज पार्किंग जे. एन.पी. टी रोड येथे ठेवले होते त्या टायर पैकी ३६ हजार रुपये किमतीचे २ टायर ड्रायव्हर रोमि गिल (वय ३६) याने लबाडीच्या इराद्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## फूटपाथवर टेबल लावून बिर्याणी विक्री करणाऱ्यावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील करंजाडे परिसरात बेकायदेशीररित्या फूटपाथवर टेबल लावून शेगडी ठेवून ते सिलेंडर च्या सहाय्याने पेटवून बिर्याणी विक्री करणाऱ्या दोघाजणांविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

करंजाडे सेक्टर ०५ येथे बबूराम यादव (वय ३५ ) व सेक्टर ०३ येथे फरयाद जीमल अहमद अली (वय २९) या दोघांनी बिर्याणी विक्री साठी बेकायदेशीररित्या फूटपाथवर टेबल लावून शेगडी ठेवून ते सिलेंडर च्या सहाय्याने पेटवून ज्वालाग्रही साहित्याचा जाणीवपूर्वक हयगयीने वापर करून मानवी जीवनास धोका व रहदारीस अडथळा निर्माण करताना मिळून आल्याने त्यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जोशी, स.पो.नि मोनाली चौधरी, पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे व त्यांच्या पथकाने याच्या विरोधात कारवाई केली आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# दिघी बंदराच्या अवजड वाहतुकीचा त्रास; सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळ

## अवजड वाहतुकीकडे आरटीओचे अर्थपूर्ण दुर्लक्ष?

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी – म्हसळा मार्गावर दिघी पोर्टच्या वाहनांची ओव्हरलोड वाहतूक गंभीर समस्या बनली आहे. हे सारे नेहमीचेच असल्याचे येथील ग्रामस्थ सांगतात. मात्र, बिनदिक्कत चालणाऱ्या दिघी पोर्ट च्या आडमुठ्या कारभारामुळे स्थानिक प्रशासन विरोधात ग्रामस्थांचा रोष वाढत आहे.

दिघी ते माणगाव या मार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे अर्धवट स्थितीत आहेत. मात्र, हे ६० किलोमीटर अंतर कापण्यासाठी अवजड वाहनांचा प्रवास इतर प्रवाशांसाठी धोकादायक बनला आहे. दहा किंवा बाराचाकी तसेच याशिवाय मोठ्या वाहनांतून क्षमतेपेक्षा अधिक माल भरून कोळशाचा डोंगर रचला जात आहे. यामुळे रस्त्यावरती कोळशाची गळती तसेच



वेगाची मर्यादा ओलांडल्याने छोटया – मोठया अपघाताच्या घटना सुरूच आहेत. दिघी, वेळास तसेच गोंडघर फाटा येथून प्रवास करणे जिकरीचे ठरले असून अवजड वाहनांचा सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे.

दररोज मोठमोठी अवजड वाहने बिघाड होऊन रस्त्यावर दिवसभर उभी असतात. तर कोळसा घेऊन जाताना वाहनांच्या जवळ चालत जायला देखील भीती वाटते, गावागावातून रस्त्यालगत लहान मुलांची शाळा आहे, दिवसा – रात्री अवजड वाहतूक होताना कोणत्याही क्षणी दुर्घटना होण्याची भीती नेहमी सतावत असते असे ग्रामस्थ सांगतात. डंपर आणि ट्रेलरमधील ओव्हरलोड वाहतूक ही एक विकृतीच असून त्यांच्यापुढे कारवाई करणाऱ्या यंत्रणाही बधीर झाल्या आहेत.

वाहनावर कारवाईचा अधिकार आरटीओ तसेच संबंधित विभागाला असतो. मात्र, प्रादेशिक वाहतूक परिवहन विभागाच्या अधिकार्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने येथील सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मात्र, अवजड वाहतूक ही होतच आहे.

## पनवेल महापालिकेच्या सुका कचरा संकलन पासबुक योजनेस शाळांचा उत्तम प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त तथा प्रशासक श्री.गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक वर्गीकरणाचे महत्व महापालिकेच्यावतीने विद्यार्थ्यांना पटवून देऊन ‘सुका कचरा संकलन पासबुक योजना महापालिका कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत चारही प्रभागांमधील विविध शाळांतील विद्यार्थ्यांच्या घरांतील टाकाऊ प्लास्टिक शाळेच्या माध्यमातून गोळा केले जात आहे. गेल्या दोन महिन्यात या योजनेला विविध शाळांमधील विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळतो आहे.

या दोन महिन्यात कळंबोली प्रभागामध्ये कारमेल शाळेने सर्वांत जास्त म्हणजे ३३९ किलो प्लास्टिक गोळा करण्यातआले आहे. पनवेल प्रभागामधून केईएस इंग्लीश मिडीयम स्कुलमधून ११० किलो प्लास्टिक संकलित करण्यात आले आहे. तसेच खारघरमधील सेक्टर, २१ मधील अपेजॉय स्कूलमधून १०१ किलो प्लास्टिक संकलन करण्यात आले आहे तर कामोठे प्रभागामधून मराठी जिल्हा परिषद शाळेमधून सर्वांत जास्त प्लास्टिक गोळा करण्यात आले. या सर्व शाळांचे महापालिकेच्यावतीने कौतुक करण्यात येत आहे. ‘सुका कचरा संकलन पासबुक योजनेचा’ शुभारंभ मागील दोन महिन्यापुर्वी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये घनकचरा विभागाच्यावतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये करण्यात आला होता. यावेळी उपायुक्त सचिन पवार यांनी विविध शाळांच्या मुख्यध्यापकांना या योजनेमध्ये सामिल होण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला चारही प्रभागांमधून उत्तम प्रतिसाद मिळत असून दर गुरूवारी वेळापत्रकाप्रमाणे शाळांमध्ये प्लास्टिक गोळा करण्यासाठी महापालिकेच्यावतीने गाडी पाठविण्यात येत आहे. युनीसेफ आणि सीएसीआर कंपनीच्या मार्फत हे प्लास्टिक गोळा केले जात आहे. सीएसीआर कंपनीचे प्रतिनिधी नितिन वाधवानी यांनी या गोळा केलेल्या प्लास्टिकच्या टाकाऊ वस्तूंपासून पुर्नवापर करून तयार करण्यात येणाऱ्या शालेय वस्तू या पुन्हा त्या शाळांनाच देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. अशा प्रकारे कचरा वर्गीकरणासाठी सुका कचरा संकलन पासबुक योजना सुरू करणारी पनवेल महानगरपालिका ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका असणार आहे. सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी या स्पर्धेमध्ये दोन हजारपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना युनीसेफ आणि महापालिकेच्यावतीने प्रशस्ती पत्रक देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षक, विद्यार्थी आणि शाळेस पारितोषिक देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

## खा.श्रीरंग बारणे यांच्या हस्ते बाळासाहेबांची शिवसेना पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंदूहृदयसम्राट पक्षप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे व शहर संघटक अभिजीत साखरे यांच्या सल्लयाने खासदार श्रीरंग (अप्पा) बारणे यांच्या हस्ते बाळासाहेबांची शिवसेना विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

त्यामध्ये विभाग प्रमुख आशिष पनवेलकर, उपविभाग प्रमुख नंदकुमार मांढरे, शाखा प्रमुख रमेश बेद, शाखा प्रमुख अविनाश साफल्य, शाखा प्रमुख विराज वाघीलकर, शाखा प्रमुख विनायक गांगर्डे, शाखा प्रमुख सागर पुणंदीकर, शाखा प्रमुख मंदार काणे, शाखा प्रमुख प्रणित मालगुंडकर, उपशाखा प्रमुख प्रभाकर कोळी, उपशाखा प्रमुख रवी मंगवाणा, प्रसिद्धी प्रमुख पनवेल तौफीक अब्दुल बागवान यांना नियुक्ती पत्र देण्यात आली आहेत.



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र स्मृतीस शिवालय येथे अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र स्मृतीस शिवालय येथे अभिवादन करण्यात आले.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव, परमपूज्य, क्रांतिसूर्य, विश्वरत्न, बोधिसत्व, प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक विषमतेने ग्रासलेल्या भारतीय समाजाला समतेचा मार्ग दाखवला.

उपेक्षित व शोषित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष केला व त्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचले अशा महामानवाला महापरिनिर्वाण दिनी विनम्र अभिवादन करण्यासाठी कर्जत येथील शिवालय येथे सर्व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख नितीनसावंत, तालुकाप्रमुख उत्तम कोळंबे, कर्जत तालुका युवासेना सचिव ॲड.संपत हडप, नगरसेवक विवेक दांडेकर, माजी शहर प्रमुख भालचंद्र जोशी, माजी नगरसेवक संतोष पाटील, युवासेना उपतालुका अधिकारी विश्वनाथ बोराडे, विभागप्रमुख मंगेश राऊत, अविनाश भासे, पंचायत समिती संघटक एकनाथ कोळंबे, दिनेश भासे, शाखाप्रमुख अरुण निघोजकर, समीर साळोखे, विनायक पाटील, तेजस इंगळे, रघुनाथ कोळंबे, उपसरपंच ज्ञानेश्वर तुपे, जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर भालिवडे आणि शिवसैनिक उपस्थित होते.

## किल्ले स्पर्धेतील पनवेलच्या मावळ्यांनी अनुभवली किल्ले रायगडची सफर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जाणीव एक सामाजिक संस्था, पनवेलचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक नितीन जयराम पाटील यांच्यातर्फे सालाबादप्रमाणे दिपावली २०२२ किल्ले बांधणी स्पर्धेचे आजोजन करण्यात आले होते. यावर्षी संस्थेतर्फे किल्ले स्पर्धेतील प्रत्येक सहभागी स्पर्धकास मोफत रायगड किल्ल्याचे दर्शन घडवणार असल्याचे जाहीर केल्यानंतर ही स्पर्धे ला एका विशिष्ट उंचीवर जाऊन पोहचली होती. छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास नवीन पिढीला अधिक माहिती व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन पाटील यांनी सांगितले.

किल्ले स्पर्धेचे आयोजन करून जाणीव एक सामाजिक संस्थेने व संस्थेचे सर्वेसर्वा नितीन पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृती जागवण्याचे काम केले. यावर्षी या स्पर्धेत जवळपास २०० स्पर्धकांनी सहभाग घेतला असून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. किल्ले स्पर्धे त सहभागी तरुणांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जवळुन अनुभवता यावा यासाठी किल्ले स्पर्धेत सहभागी प्रत्येक मावळ्यास मोफत ’रायगड दर्शन’ घडवण्यात येणार असल्याचे नितीन पाटील यांनी जाहीर केले होते. त्यामुळे या स्पर्धेत मोठ्या संख्येने तरुणांनी सहभागी नोंदविला. या धर्तीवर किल्ले स्पर्धेतील सहभागी १०० हुन अधिक स्पर्धकांनी नुकतेच किल्ले रायगडच्या दिशेने प्रस्थान केले.

यावेळी रायगड किल्ल्यावर इतिहासाची सविस्तर माहिती मिळावी याकरिता स्थानिक गाईड बरोबरच पनवेल मधील दुर्गप्रेमी सागर मुंडे व त्यांचे सहकारी हे सुद्धा सहभागी झाले होते. रायगड दर्शन करून आल्यानंतर स्पर्धक आणि त्यांचे पालकांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण होते. किल्ले रायगड दर्शनाचे नीटनेटके आयोजन व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आमच्या पाल्याला माहिती करून दिल्याबद्दल जाणीव संस्था व नितीन पाटील यांचे पालकांनी आभार मानले व पुढील उपक्रमास शुभेच्छाही दिल्या.

रायगड दर्शन यशस्वी करण्यासाठी संस्थचे सदस्य प्रसाद कंधारे , सचिन नाझरे, विजय डिसोझा, नरेंद सोनवणे, विजय वाघ, अक्षय शिंदे, नितेश भगत, प्रफुल्ल सकपाळ, अमित पालकर, कौस्तुभ मराठे, केतन खुटले, धनश्री कंधारे, रसिका खुटले, ओंकार शेलार, रवी संदेपाल, प्रतीक पोवार,आदित्य कोळी, योगांश रायकर, मयूर फडतरे, विनीत मढवी, रसिका सुतार, ओम सोनटक्के, गायत्री सुतार, मिहीर हिंगू, तसेच अभिनव युवक मित्र मंडळाचे पदाधिकारी राजू सावंत, परेश बोरकर, प्रदीप कुंभार, मयूर चिटणीस, प्रकाश लाड यांनी विशेष मेहनत घेतली.

## गाव जोडणाऱ्या पुलाचे माजी सैनिकाच्या हस्ते भूमीपूजन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुक्यातील मोर्बा विभागातील देगाव गाव हे लढवय्ये मराठे आणि माजी सैनिकांचे गाव म्हणून ओळखले जाते. मोर्बा विभागातील गावे आणि देगाव गावाला जोडणारा देगाव येथील रस्ता क्रमांक १३७ वरील पूल हा निकामी झाल्याने २०१७ मधील महाड सावित्री पूल दुर्घटनेनंतर वाहतुकीस बंद करण्यात आला होता, त्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये देगाव गा–वचे सुपुत्र जेष्ठ नागरिक स्थानिय लोकाधिकार समिती महासंघ सदस्य तसेच शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिंडोशी विभाग समन्वयक काशिनाथ महादेव गायकवाड यांनी तत्कालीन पक्ष प्रतोद आम सुनील प्रभू, तत्कालीन बांधकाम मंत्री नाम.अशोक चव्हाण, यांच्याकडे पत्रव्यवहार करून व प्रत्यक्ष भेट घेवून व त्याचा पाठपुरावा करून पुलाच्या कामाची मंजुरी करून घेतली. त्याकरिता नाबार्ड वित्तीय संस्थेकडून अंदाजित रक्कम २कोटी ३२ लाख १९ हजार मंजूर झाले. या कामाचे भूमीपूजन ४ डिसेंबर



रोजी खेमदेव ग्रामस्थ देगाव मधील माजी सैनिक विठोबा मारुती परबळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमप्रसंगी देगाव ग्रामस्थ गजानन गायकवाड, दिलीप गायकवाड, विजय इंगळे, मनोज इंगळे, हरेश गायकवाड, बाळा गायकवाड, एकनाथ गायकवाड, कृष्णा गायकवाड, मंगेश कदम, प्रतीक दिवेकर, मारुती गायकवाड, मंगेश गायकवाड, विलास गायकवाड, तेजप काशिनाथ ठाकूर, ऍड अनिकेत ठाकूर, विष्णु पवार, अशोक मर्चंडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी सर्व उपस्थित ग्रामस्थांनी येणाऱ्या भावी कालावधीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाशी एकनिष्ठ राहण्याचा निर्णय घेतला. माण–गाव तालुक्यातील देगाव ग्रामस्थांनी माजी सैनिकांच्या हस्ते केलेले गावाच्या विकासकामाच्या भूमीपूजन कार्यक्रमाची चर्चा माणगाव तालुक्यात रंगली आहे आणि सुजाण माणगाव तालुका वासीय नागरिकांकडून देगाव ग्रामस्थांच्या या महत्वपूर्ण निर्णयाचे कौतुक होत आहे.

## जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे रक्तदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानचे विश्वस्त तथा जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स व जी. एम. वेदक इंजिनिअरिंग कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी डॉ. नंदकुमार गोपीनाथ वेदक यांच्या ७८ व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन सायन्स महाविद्यालयात करण्यात आले होते. याप्रसंगी ५४ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे.

राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांचे माध्यमांतून रक्तदान शिबिर आयोजित करताना रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान म्हणून समजत असताना याद्वारे माणसाला जीवनदान देखील मिळू शकते. जगण्यासाठी मनुष्याला रक्ताचा फार मोठ्या उपयोग होत असतो. अनेक रुग्णांना आजारपणात रक्ताची आवश्यकता भासते. अशावेळी या रक्तदात्यांनी केलेले रक्तदान उपयुक्त ठरते. अनेक विद्यार्थी व कर्मचारी यांनी अनेक वेळा रक्तदानाद्वारे आपल्या शिक्षण महर्षी डॉ. नंदकुमार वेदक यांना शुभेच्छा देत शिक्षणासारखे महत्त्वाचे कार्य तुमच्या हातून घडतानां हजारो विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी ईश्वर तुम्हास शतायुष्य देवो. अशी सद्भावना याप्रसंगी व्यक्त करणेत आली.

डॉ. नंदकुमार वेदक यांनी तळे सारख्या छोट्याश्या तालुक्याच्या ठिकाणी दुर्गम विभाग असूनही इंजिनीअरिंग कॉलेज, सायन्स महाविद्यालय, एम.एस.सी., रिसर्च सेंटर, बी.एस.सी.आय.टी., कम्प्युटर सायन्स यासारखे विभाग सुरू करून सामान्य कुटुंबातील युवक–युवतींना शिक्षणाचे दालन खुले करून दिले आहे. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन नोकरीला लागले आहेत. या कृतज्ञते पोटी दरवर्षी ४ डिसेंबर या डॉ. नंदकुमार वेदक यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन करून समाजसेवा या माध्यमांतून केली जाते. कोविड काळात संपूर्ण महाराष्ट्रात रक्ताचा तुटवडा पडलेला असताना शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, मंडळे अशा विविध संस्थांमार्फत रक्तपुरवठा उपलब्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आले.

अलिबाग रायगड शासकीय रक्त पेढीचे संक्रमण अधिकारी डॉक्टर दिपक गोस–ावी यांनी आपल्या मनोगतामध्ये रक्तदान का करावे, रक्ताचा उपयोग तसेच कोणत्या आजारासाठी विशेषता रक्त उपयुक्त ठरू शकते. आपण केलेल्या रक्तदानामुळे अनेक जीव वाचू शकतात. सजीव प्राण्यामध्ये मनुष्याचेच रक्त मनुष्यालाच उपयोगी पडू शकते. यासारखे मार्गदर्शन डॉक्टर गोसावी यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य विजय सरोदे, पुरुषोत्तम मुळे यांनी रक्तदान शिबिराच्या आयोजनाची संकल्पना सांगितली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी रायगड जिल्हा शासकीय रक्त पेढीचे संक्रमण अधिकारी डॉक्टर दिपक गोसावी, सहकारी प्रशांत तुरुरे, सुनील बंदीसोंडे, मंगेश पिंगारा, राजाराम गायकवाड यांचे सह एन.एस.एस. प्रमुख डॉ. विवेक राणे, डॉ. नसरींन शेख, आजीवन अध्ययन विभाग प्रमुख हर्षद सोनवणे, प्राचार्य विजय सरोदे यांच्या मार्गदर्शना खाली सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी एम.एससी. चे विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा हर्षद सोनवणे यांनी केले.